# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 31/2022  दिनांक : 24.01.2022

## 1)खुनः–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 18.12.2021 रोजी चे 11.00 वा. ते दिनांक 22.01.2022 आज पावेतो वेळ तारीख निश्चित नाही, **जुना कौठा परिसरात नांदेड येथे,** यातील फिर्यादी चा चुलत भाऊ **मयत नामे सुनिल सुरेश सुलगेकर, वय 21 वर्षे, रा. बंदाघाट रोड गोळवलकर ब्लड बॅकेचे जवळ, नांदेड**, यास यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करुन आरोपीचे पत्नी सोबत अनैतिक संबंध व मैत्रीनी सोबत असलेले प्रेमसंबंध याचेवरुन झालेल्या वादाचे कारणावरुन नमुद आरोपीतांनी मयत यास जिवे मारण्याकरीता दारु पाजुन त्यास नशा चढवुन जुन्या कौठा परिसरास त्याचे डोक्यात दगड घालुन जिवे ठार मारुन पुरावा नाहिसे करण्याचे उद्देशाने त्याचे प्रेत जाळुन हाडाची विल्हेवाट लावली आहे. वगैर **फिर्यादी व्यंकटेश राजु सुलगेकर वय 24 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. बंदाघाट रोड गोळवलकर ब्लड बॅकेचे जवळ, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 39/2022 कलम 302,201,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री विजय पाटील, मो.नं. 9823155291** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**भोकर :–**दिनांक 22.01.2022 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शिवारात मौजे पाळज ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचे शेतात जावुन फिर्यादीस धक्काबुक्की करुन गळयातील दोन तोळयाची सोन्याची चैन अंदाजे किंमत 70,000/– रुपयाची बळजबरीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी सुनिताबाई सत्यनारायण रेडी करेमवार, वय 52** वर्षे **व्यवसाय घरकाम व शेती रा. किनी ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 30/2022 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री पाटील**, **मो.क्र. 9850550670** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 12.01.2022 रोजी चे 23.30 ते दिनांक 13.01.2022 रोजी चे 05.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरा समोरुन गंगानगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा कंपनीची ॲक्टीव्हा काळया रंगाची मो सा क्र. एमएच–26/एडब्ल्यु–9318 जुनी किंमती 16,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी मो. फारुख मो. याखुब, वय 59 वर्षे, व्यवसाय हॉटेल चालक रा. मंढई मस्जीद जवळ इतवारा नांदेड, ह.मु. गंगानगर,नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 44/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1224 सुर्यवंशी**, **मो.क्र. 8329712505** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 20.01.2022 रोजी चे 08.30 ते दिनांक 21.01.2022 रोजी चे 06.30 वा. चे दरम्यान, **नरसिंह मंदीराचे पाठीमागे विरभद्रनगर कौठा, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची बजाज पल्सर 150 कंपनीची काळया रंगाची लाल पटे असलेली मो सा क्र. एमएच–26/एपी–5972 जुनी किंमती 25,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी ओमकार केरबा हलबांडगे, वय 33 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. कुरुळा ता. कंधार जि. नांदेड, ह.मु. विरभद्रनगर कौठा,नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 40/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1224 सुर्यवंशी**, **मो.क्र. 8329712505** हे करीत आहेत.

## 4)जनावर चोरी :–

**माळाकोळी :–** दिनांक 23.01.2022 रोजी चे 00.30 ते 01.00 वा. चे दरम्यान, **मौजे लिंबोटी शिवार फिर्यादीचे शेतात आखाडयावर ता. लोहा जि.नांदेड येथे,** यातील फिर्यादी जेवण खावन करुन आखाडयावरील बैलांना चारापाणी करुन झोपी गेला. रात्री कुत्रा भुंकत असल्याने पाहिले असता दोन बैलजोडी किंमत अंदाजे 80,000/–रुपयाचे नमुद ठिकाणावरुन नमुद आरोपीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी भारत संभाजी जामकर, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. लिंबोटी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 06/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/486 तेलंगे**, **मो.क्र. 9511230046** हे करीत आहेत.

## 5)रेती चोरी :–

**कुंडलवाडी :–**दिनांक 23.01.2022 रोजी चे 06.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर नागनी ते हुनगंदा जाणारे रोडवर ता. बिलोली जि.नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन बिना रजिस्ट्रेशन असलेल्या ट्रॅक्टर, ट्रॉली मध्ये लाल रंगाची रेतीची चोरटी वाहतुक करताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी आरविंद बळीराम शिंदे, वय 45 वर्षे, व्यवसाय पोलीस पाटील मौजे नागनी ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 13/2022 कलम 379,511,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2821 चव्हाण**, **मो.क्र. 8606267380** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**हदगाव :–** दिनांक 12.02.2021 रोजी ते दिनांक 01.01.2022 रोजी पावेतो, **फिर्यादीचे सासरी व माहेरी हुसेन कॉलनी बदनापुर जि. जालना व पोलीस कॉलनी ईदगाह रोड हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद आठ आरोपीतांनी संगणमत करुन व्यवसाय करण्यासाठी तुझ्या माहेरहुन पाच लाख रुपये घेवुन ये म्हणुन तीचा शारिरीक व मानसीक छळ करुन मारहाण केली. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 23 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 18/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2342 व्ही.बी. हंबर्डे** , **मो.क्र. 9284422052** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**नायगाव :–** दिनांक 23.01.2022 रोजी 14.30 वा. चे सुमारास, **नायगाव ते लालवंडी जाणारे रोडचे बाजुला उमाजी आनंदराव जाधव यांचे शेतात, नायगाव ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद 05 आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या पत्यावर पैसे लावुन तिरट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 3,750/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री शिवकुमार सिद्राम बाचावार, ने. पोस्टे नायगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 12/2022 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/ मुस्तापुरे**, **मो.क्र. 9325850996** हे करीत आहेत.

## 8)गळफास घेवुन मृत्यु :–

**मुखेड :–**दिनांक 23.01.2022 रोजी चे सकाळी 07.30 वा. ते 14.30 वा. चे सुमारास, **सोनबा हैबती गजगे यांचे शेतात शिकारातांडा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संतोष रामराव जाधव, वय 26 वर्षे, रा. शिकारातांडा ता. मुखेड जि. नांदेड**, याने मानसिक तनावामध्ये लिंबाचे झाडाला गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार रामराव चिमनाजी जाधव, वय 60 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शिकारातांडा ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मुखेड** आ. मृ. **03**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1762 वाघमारे, मो.नं. 9923481762** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड